# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational Crimes**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **18/07/2022**

**Brief of the work done :-**

खून प्रकरणातील आरोपीस तातडीने अटक ; मानोरा पोलिसांची कारवाई.

# युवकाचा खून करुन फरार आरोपीस पोलिसांनी केले जेरबंद

## कार्ली येथील घटना

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ तालुक्यातील कार्ली येथे १५ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान भरचौकात जुन्यावैमनस्यातुन युवकांच्या छातीवर व मानेवर धारदार हातातील वीळामारून खून केल्याची घटना घडली.यावेळी घटनास्थळावरुन अंधाराचा फायदा घेऊन आरोपी फरार झाला होता. १६ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान कार्ली परिसरातील कसोसीने शोध घेत अखेर पोलिसांनी आरोपीस जेरबंद केले.

प्राप्त माहिती नसार तालुक्यातील कार्ली हे गाव शहरांच्या काही अंतरावर असुन शहरात नागरिकाची नेहमी वर्दळ असते.अचानकपणे झालेली खुनाची घटना १५ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजताच्या दरम्यान भरचौकात जूनै वैमनस्याच्या कारणाने दोघामध्ये शाब्दिक चकमक उडाली असता आरोपी राजु रामदास पांडे यांनी त्यांच्या हातातील धारदार वीळा संजय दत्ता बावणे यांच्या छात्यावर व मानेवर मारल्याने तो जागीच ठार झाला.याप्रकरणी मानोरा पोलिसांनी आरोपी विरूध्द कलम ३०२ दाखल केली.



आरोपीने खन केल्यावर रक्ताचा पाठ वाहत होता.यावेळी आरोपी तेथून फरार होण्यास त्याला यश मिळाले.मात्र मानोरा पोलीस निरीक्षक ब्राम्हदेव शेळके यांनी तात्काळ पोलिसांच्या तुकड्याची नेमणूक करुन त्यांना शोध कामात पाचारण करण्यात आले.आणी स्वतः कार्ली परिसरातील रात्रिच्या वेळी संपूर्ण जंगलात शोध मोहीम राबविली.रात्रीला काहीच हाती न लागल्याने १६जुलै च्या सकाळी कार्ली या गावांच्या सभोवताली १५ कीमी परिसर पिंजून काढला असता आरोपीचा शोध लागत नव्हता.परंतु खुनी आरोपीच्या शोधकामी संपूर्ण पोलीस लागल्याने आरोपी लपतछपत कार्ली जंगल परीसरात दिसुन आला.याक्षणी ठाणेदार ब्राम्हदेव शेळके, एपीआय महेश कुचेकर, पोलीस उपनिरीक्षक सविता वड्डे, रामेश्वर नागरे,डीबी पथक प्रमुख गणेश जाधव, मयुरेश तिवारी, बालाजी मह्ल्ले, बन्सी चव्हाण, तथा बीट जमादार संदीप बरडे, टागत, सोनकांबळे, रायटर दिपक ढोबळे, नरेंद्र खाडे यांनी आरोपी दिसताच क्षणी तात्काळ राजु पांडे यास अटक करण्यात आली.आणी आरोपीस मानोरा पोलीस स्टेशनला हजर करण्यात आले. १५जुलैची रात्र आणी १६जुलैची सायंकाळ पर्यत पोलिसांची शोध मोहीम सुरूच असतांना अखेर मानोरा पोलिसांनी आरोपीस जेरबंद केले.(श.प्र.)